लोकसत्ता पृ.पा.१.

## बैलगाडा शर्यतप्रकरणी भाईंदरमध्ये गुन्हा दाखल



लोकसत्ता वार्ताहर

**भाईंदर :** डांबरी रस्त्यावर बेकायदा बैलगाड्यांची शर्यत घेऊन बैलाला गंभीर जखमी केल्याप्रकरणी भाईंदर पोलीस ठाण्यात गुन्ह्याची नोंद करण्यात आली आहे. या संदर्भातील चित्रफीत समाजमाध्यमांवर प्रसारित झाली होती.

नाताळ सणानिमित्त २६ डिसेंबर रोजी भाईंदर पश्चिम येथील उत्तन भागातून अनेक नागरिक हे काशिमीरा चर्च येथे येतात. यात अनेक नागरिक हे पारंपरिक बैलगाडीने प्रवास करतात. मात्र यातील अनेक जण हे भर रस्त्यात बैलगाडी शर्यत घेत असल्याचे दिसून येते. अशाच एका शर्यतीची चित्रफीत समाज माध्यमांवर प्रसारित झाली होती. यामध्ये

दोन व्यक्ती बैलांना वेगाने पळवत असतानाच गंभीर दुर्घटना झाली असल्याचे दिसून आले आहे. त्यामुळे जनावरांवर झालेल्या या अमानुष कृत्यावर कठोर कारवाई करण्याची लेखी तक्रार वकील किरण शर्मा यांनी पोलीस आयुक्तांना केली होती. त्यानुसार या चित्रफितीची पडळणी करून भाईंदर पश्चिम पोलीस ठाण्यात अनोळखी व्यक्तींविरोधात गुन्ह्याची नोंद करण्यात आली असून आरोपींचा शोध सुरू असल्याची माहिती साहाय्यक पोलीस निरीक्षक विश्वास बाबर यांनी दिली.

पुढारी पृ.पा.२.

## शौचालय ठेकेदारावर फौजदारी गुन्हा दाखल करा

**भाईंदर : पुढारी वृत्तसेवा**

मिरा-भाईंदर महापालिकेने मेसर्स शाईन मेंटेनन्स सर्व्हिसेस प्रा. लिमिटेड या कंपनीला शहरातील १५० हून अधिक सार्वजनिक शौचालयांच्या देखभाल, दुरुस्तीचा ठेका २०२० मध्ये दिला. दरम्यान कंपनीकडून कामगारांना किमान वेतन कायद्यांतर्गत वेतन दिले जात नसल्याचा ठपका ठेवत पालिकेने कंपनीचा ठेका २०२२ मध्ये रद्द केला. बिले काढण्यासाठी कंपनीने पालिकेला कामगारांच्या भविष्य निर्वाह निधीसह कामगार विम्याची खोटी कागदपत्रे सादर केल्याचा आरोप भाजप जिल्हाध्यक्ष ॲड. रवि व्यास यांनी केला आहे. कंपनीने पालिकेसह कमर्चाऱ्यांची फसवणूक केल्याने कंपनीला काळ्या यादीत टाकून तिच्यावर फौजदारी गुन्हा दाखल करण्याची मागणी व्यास यांनी आयुक्त दिलीप ढोले यांच्याकडे केली.

पालिकेने कंपनीला ३ नोव्हेंबर २०२० रोजी शहरातील सुमारे १५० हुन अधिक सार्वजनिक शौचालयांच्या देखभाल, दुरुस्तीचा ठेका दिला. त्यासाठी मंजूर दरानुसार पालिकेने एका कामगारासाठी एका महिन्याकरीता सुमारे ३० हजार रुपये तर एका सुपरवायझरकरीता एका महिन्यापोटी ३५ हजार रुपये वेतन देण्यास मान्यता दिली. कंपनीने किमान वेतन कायद्यानुसारच कामगारांना वेतन देणे अनिवार्य असताना कंपनी कामगारांना एका महिन्याकाठी ३ ते ९ हजार रुपयेच वेतन देत असल्याचा आरोप व्यास यांनी केला आहे. यावरून कंपनीने पालिकेसोबत केलेल्या कराराचा भंग केल्याने पालिकेने कंपनीचा ठेका ८ सप्टेंबर २०२२ रोजी रद्द केला. मात्र कंपनीला काळ्या यादीत टाकण्यात आले नाही. तसेच कंपनीने सर्व कामगारांचे बँक स्टेटमेंट, भविष्य निर्वाह निधी व कामगार विम्याचे चलन भरल्याची खात्री करूनच प्रशासनाने कंपनीला बिले अदा करणे आवश्यक असताना तसे न करता कंपनीला बिले अदा करण्यात आल्याचा आरोप त्यांनी केला आहे.

पुढारी पृ.पा.४.

## सिझान खानच्या जामीन अर्जावर तारीख पे तारीख; ११ जानेवारीला सुनावणी

**नालासोपारा :** तुनीषा शर्मा आत्महत्या प्रकरणातील आरोपी सिझान खान याच्या जामीन अर्जावर आज वसई सत्र न्यायालयात सुनावणी झाली. यावेळी सिझान खानच्या जामीन अर्जावर ११ जानेवारीला सुनावणी होणार असल्याचे न्यायालयाने स्पष्ट केले आहे. त्यामुळे सिझानची न्यायालयीन कोठडी आणखी दोन दिवसांसाठी वाढली आहे. आज न्यायालयात सिझान व तुनीषा या दोघांच्या वकीलांमध्ये झालेल्या युक्तीवादात सिझानच्या वकिलांनी न्यायालयासमोर एक मोठा खुलासा केला आहे. ज्यात तुनीषाने आत्महत्या करण्याआधी ए नावाच्या मित्राशी फोनवरून संभाषण केले होते. सिझानच्या वकिलांनी न्यायालयासमोर सांगितलेल्या या गोष्टीवरून या प्रकरणाला आता एक नवे वळण मिळाले आहे. दरम्यान तुनीषाच्या वकिलांना ए नावाच्या इसमाबाबत पत्रकारांनी विचारणा केली असता त्यावर त्यांनी कोणतीही प्रतिक्रिया देण्यास नकार दिला आहे. मात्र सिझानच्या वकिलांनी काही फोटो, औषधांबाबत काही फाईल सबमिट केले आहेत, काही कागदपत्रे फाईल केले आहेत. त्यामुळे त्याला उत्तर देण्यासाठी आम्ही एक तारीख मागितली आहे. कारण आमचे काही तथ्य बाहेर आणणार आहोत. सिझानच्या वकिलांनी हि सुनावणी इन कॅमेरा व्हावी, पत्रकारांना कोर्टात मज्जाव करावा अस म्हणण मांडलं होत. ते चुकीच असल्याचे मत तुनिषाच्या वकिलांनी सांगितले असून ११ तारखेला तुनिषाला न्याय मिळेल असे तुनिषाचे वकील तरूण शर्मा यांनी सांगितले.

सामना पा.नं.२.

# राज्यातील ६६६ सीबीएसई शाळांची तपासणी

## बनावट प्रमाणपत्र प्रकरणी पोलिसांत तक्रार




**पुणे, दि. ९ ( प्रतिनिधी ) - राज्यात केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळाच्या ( सीबीएसई ) शाळांच्या बनावट ना-हरकत प्रमाणपत्रांच्या प्रकरणी शिक्षण विभागाकडून पोलिसांत तक्रार दाखल करण्यात आली आहे. युडायस प्रणालीत माहिती न जुळणाऱ्या राज्यातील ६६६ सीबीएसई शाळांची तपासणी करण्यात येणार असल्याची माहिती शिक्षण आयुक्त सूरज मांढरे यांनी दिली.**

मंत्रालयातील उच्चपदस्थ अधिकाऱ्यांची नावे आणि बनावट स्वाक्षऱ्यांचा वापर करून सीबीएसई शाळांना बनावट ना हरकत प्रमाणपत्र देण्यात आल्याचा प्रकार नुकताच उघडकीस आला. या संदर्भातील पुण्यातील तीन शाळांची चौकशी करण्यात आली. त्या अनुषंगाने अधिक तपासणी केली असता, पुणे परिसरातील अन्य काही शाळांची ना हरकत प्रमाणपत्रे बनावट असल्याचे निदर्शनास आले. शाळांना बनावट प्रमाणपत्र देणारी एक टोळी असल्याचे, या प्रमाणपत्रांसाठी लाखो रुपयांचे व्यवहार झाल्याचेही पुणे जिल्हा परिषदेच्या अधिकाऱ्यांनी केलेल्या चौकशीतून स्पष्ट झाले.

या पार्श्वभूमीवर शिक्षण आयुक्त सूरज मांढरे म्हणाले, बनावट प्रमाणपत्र प्रकरणी पोलिसांत तक्रार दाखल करण्यात आली आहे. राज्यातील ६६६ शाळांची माहिती युडायस प्रणालीतील माहितीशी जुळत नसल्याचे निदर्शनास आले आहे. त्यामुळे संबंधित शाळांच्या मान्यतेसंदर्भातील कागदपत्रे तपासण्याचे आदेश शिक्षणाधिकाऱ्यांना देण्यात आले आहेत. त्याबाबतचा अहवाल सादर झाल्यावर पुढील कार्यवाही करण्यात येईल.

> संबंधित तीन राज्यमंडळांच्या शाळांनी केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळाची मान्यता असल्याचे दर्शविले होते. परंतु, संबंधित शाळांकडे मंडळाची मान्यता नसल्याचे उघडकीस आले आहे. त्यामुळे सर्व क्षेत्रीय अधिकाऱ्यांना पत्र देणार असून, सीबीएसई मंडळाची मान्यता असलेल्या सर्वच शाळांची चौकशी करण्याचे आदेश दिले जाणार आहेत.
>
> - औदुंबर उकिरडे, शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग.

पुढारी ५-१-१७.

# वेश्या व्यवसायास प्रवृत्त करणाऱ्या दोघांना अटक



भाईंदर : पुढारी वृत्तसेवा

मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालयांतर्गत तुळींज पोलीस ठाण्याच्या हद्दीतील नालासोपारा पूर्वेच्या संतोष भवन परिसरात असलेल्या स्वागत लॉजमध्ये वेश्यागमनाकरीता महिला पुरविल्या जात असल्याची माहिती गुन्हे शाखेचे सहाय्यक पोलीस आयुक्त अमोल मांडवे यांना ७ जानेवारी रोजी मिळाली होती. त्याआधारे त्यांनी अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंध कक्षाचे पोलीस निरीक्षक संतोष चौधरी यांना कारवाईचे आदेश दिले.

कक्षातील पोलीस पथकाने शनिवारी बोगस ग्राहकाद्वारे वेश्यादलाल विशाल याला संपर्क साधून वेश्यागमनासाठी मुलींची मागणी केली. त्यासाठी विशालने मोबदला तसेच स्वागत लॉजमधील रूमचे भाडे व कमिशन असे एकूण ३ हजार ५०० रुपयांची मागणी केली. त्याला मान्य करीत पोलिसांच्या पथकाने दोन पंचासह लॉजमध्ये धाड टाकली. तेथून पोलिसांनी वेश्यादलाल विशाल कुमार धनेश्वर पंडीत (२२) व लॉजच्या काऊंटरवरील मॅनेजर यल्लप्पा आनंद कुंचीपोरव (४८) यांना ताब्यात घेतले. तसेच दोन पिडीत महिलांची सुटका करून त्यांना महिला सुधारगृहात पाठविले. याप्रकरणी तुळींज पोलीस ठाण्यात भादंविसं मधील कलम ३७०(१), (३), ३४ सह अनैतिक मानवी व्यापार प्रतिबंध कायदा १९५६ चे कलम ३, ४, ५, ६ प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

पोलिसांनी आरोपींची चौकशी केली असता त्यात आरोपींना मदत करणारे जगदीश अण्णा, राजू पुजारी, चिराग, शेखर अण्णा व स्वागत लॉजचे मालकाचे नाव समोर आल्याने पोलिसांनी या ५ जणांवर सुद्धा गुन्हा दाखल केला असून ते फरार असल्याचे पोलिसांकडून सांगण्यात आले.

पुढारी पा. नं. ३.

ठाणे,

# अंधश्रद्धा कायद्यांतर्गत मुख्यमंत्र्यांवर कारवाई करा

## राष्ट्रवादीच्या विद्या चव्हाण यांची मागणी

**ठाणे : पुढारी वृत्तसेवा**

वाढती महागाई, बेरोजगारी यासारख्या गंभीर प्रश्नांवर न बोलता राज्यातील जागृत देवस्थान सोडून मुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे जादूटोणासाठी प्रसिद्ध झालेल्या कामाख्या देवीला जाऊन कार्य करतात? ते राज्यात धोंडगिरी करीत फिरतात. त्यांना अंधश्रद्धा निर्मूलन कायद्याअंतर्गत अटक करण्याची मागणी राष्ट्रवादी महिला काँग्रेसच्या प्रदेशाध्यक्षा विद्या चव्हाण यांनी केली. तर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या पत्नीला कोंडून ठेवण्यात आले होते. त्यांना सासूच्या अंत्यसंस्काराला येऊ देण्यात आले नाही, असा खळबळजनक दावा राष्ट्रवादी महिला काँग्रेसच्या राष्ट्रीय अध्यक्षा खा.फौजिया खान आज ठाण्यातील पत्रकार परिषदेत केला.

देशातील वाढती महागाई, बेरोजगारी यासारख्या गंभीर प्रश्नांवरून सर्वसामान्य जनतेचे लक्ष विचलित करण्यासाठी भगवा, हिरवा रंग, हिंदुत्व, लव जिहाद, हिंदू मुस्लिम, याकूब मेमनची कबर यासारखे वाद भाजपकडून मुद्दाम उकरून काढले जात आहेत. आम्हीही हिंदू म्हणून जन्माला आलो, रोज पूजा करूनच घराबाहेर पडत असतो. नव वर्षाच्या स्वागताला मंदिरांमध्ये अलोट गर्दी उसळली होती, त्या हिंदूंनी भगवे कपडे घातलेले नव्हते, असे सांगत महिला अध्यक्षा विद्या चव्हाण यांनी आठ वर्षांपासून आश्वासनांचा पाऊस पडणाऱ्या पंतप्रधान मोदी, गृहमंत्री अमित शहा, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, प्रकाश जावडेकर, श्रुती इराणी, आशिष शेलार आणि मुख्यमंत्री शिंदे यांनी वाढती महागाई, इंधन दर, बेरोजगारीवर बोलावे, असे आवाहनही केले. भाजपचे हिंदुत्व ढोंगी असून त्यांनी भगव्याचे राजकारण सुरु केले आहे. त्यांनी संविधानाने राज्य करावे, मात्र इंग्रजांची तोडा आणि राज्य करा ही रणनीती भाजपकडून वापरली जात आहे. सर्वधर्मसमभाव देणारे, भारताचे स्वातंत्र्य मला मान्य नसल्याची भूमिका मांडणारे गोळवलकर गुरुजींच्या नीतीचा पुरस्कार भाजपकडून केला जात असल्याचाही आरोप चव्हाण यांनी केला आहे.

### पंतप्रधानांच्या पत्नीला कोंडून ठेवण्याचा केला आरोप

**बेटी बचाव ,बेटी पढाव्चा पुरस्कार करणाऱ्या केंद्र सरकार महिलांना वाईट वागणूक देत आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या आईच्या अंत्यसंस्काराला त्यांच्या पत्नीला येऊ देण्यात आले नाही. मोदींच्या पत्नीला कोंडून ठेवण्यात आले होते, असे ट्विट वाचल्याचा दावा खासदार फौजिया खान यांनी केला. तर वोटिंग मशीन बंद करून बॅलेट पेपरवर निवडणुका घेण्याची मागणी ठाणे पालघरच्या अध्यक्षा ऋता आव्हाड यांनी करीत मीडियावर आगपाखड केली. यावेळी सुजाता घाग, प्रमिला केणी आदी पदाधिकारी उपस्थित होत्या.**

पुढारी पा.नं.३.

# मीरारोडमध्ये ड्रिलिंगच्या कर्णकर्कश आवाजाने रहिवाशी त्रस्त

**भाईंदर : राजू काळे**

मीरारोडच्या रामदेव पार्क परिसरातील सर्वे क्रमांक ३११ हिस्सा क्रमांक ४ वरील जागेत काँगो ग्रुप ऑफ कंपनीज या बांधकाम कंपनीमार्फत इमारतीचे काम सुरु करण्यात आले आहे. त्यासाठी पायलिंगचे काम ड्रिलिंग मशीनद्वारे सुरु करण्यात आले असून त्या मशीनच्या कर्णकर्कश आवाजाने आसपासचे रहिवाशी त्रस्त झाले आहेत. त्यांनी हा आवाज कमी करण्याबाबत विकासकासह पालिका आयुक्त दिलीप ढोले व स्थानिक पोलीस ठाण्याला पत्र दिले आहे.

रामदेव पार्कमधील श्रीजी एवेन्यू, साईचरण, एनजी सिल्वर स्प्रिंग आदी गृहसंकुलांना लागून असलेल्या सर्वे नंबर ३११ हिस्सा नंबर ४ जागेत काँगो ग्रुप ऑफ कंपनीजने इमारतीच्या बांधकामाला सुरुवात केली आहे. त्यासाठी इमारतीचा पाया खोदण्याचे काम भल्यामोठ्या ड्रिलिंग मशीनद्वारे सुरु केले आहे. हे काम दिवस-रात्र सुरु असल्याने मशीनच्या कर्णकर्कश आवाजाने आसपासच्या गृहसंकुलातील रहिवाशी त्रस्त झाले आहेत. त्या आवाजाचा सर्वाधिक त्रास वरीष्ठ नागरीक, गर्भवती महिला, लहान मुले, विद्यार्थी व रुग्णांना होऊ लागला आहे.

ड्रिलिंग मशीनद्वारे जमिनीतील माती बाहेर काढण्यासाठी मशीनला जोरदार झटके दिले जात असल्याने त्याच्या झटक्याचा आवाज परिसरात मोठमोठ्याने पसरतो. हा आवाज कमी करण्यासाठी रहिवाशांनी विकासकाला सतत फोनवरून, व्हाट्सअॅपद्वारे तसेच प्रत्यक्ष भेटून विनंती केल्याचे स्थानिक रहिवाशी प्रवीण उतेकर यांनी सांगितले. मात्र विकासकाने रहिवाशांच्या विनंतीला भीक न घालता आपले काम सुरूच ठेवले आहे. यापूर्वी देखील याच परिसरात अशाच प्रकारचे काम सुरु असताना रहिवाशांनी पालिका आयुक्तांसह स्थानिक पोलिसांकडे पत्रव्यवहार केला होता. त्यावेळी ड्रिलिंग मशीनमधील माती बाहेर काढण्यासाठी तिला झटका न देता मनुष्यबळाद्वारे स्क्रॅपरने काढण्याची सूचना रहिवाशांकडून विकासकाला करण्यात आली होती. यामुळे मशीनला झटका न बसता तीचा कर्कश आवाज परिसरात पसरणार नाही. पोलीस व पालिका आयुक्तांनी मध्यस्थी करीत विकासकाला रहिवाशांच्या सूचनेचे पालन करण्यास भाग पाडले. यंदा पुन्हा तसाच प्रकार सुरु झाल्याने रहिवाशांनी काँगो ग्रुप ऑफ कंपनीजच्या अधिकाऱ्यांना मागीलप्रमाणेच सूचना केली. विकासकाने ती मान्य देखील केली. पण अद्यापही त्याने पूर्वीप्रमाणेच काम सुरु ठेवल्याने सर्व रहिवाशांनी पालिका आयुक्तांसह स्थानिक पोलीस ठाण्यात ड्रिलिंग मशीनच्या कर्णकर्कश आवाज विरोधात पत्र दिले आहे.



लोकसत्ता पु.पा.१.

# तक्रार निवारणानंतरही महिलांना त्रास

## 'पुन:धैर्य योजने'तर्गत गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू

**लोकसत्ता विशेष प्रतिनिधी**

**वसई :** महिलांच्या तक्रारींचे निवारण झाल्यानंतरही त्यांना संबंधितांकडून त्रास देण्याचे प्रकार सुरू आहेत. पोलिसांनी अशा तक्रारींचा वर्षानंतर आढावा घेण्यासाठी पुन:धैर्य योजना सुरू केली आहे. शनिवारी झालेल्या पहिल्या आढावा बैठकीनंतर सात प्रकरणांत महिलांना त्रास सुरूच असल्याचे उघड झाले. या प्रकरणात गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे.

महिलांच्या तक्रारी आल्या तर त्याची गंभीरतेने दखल घेऊन गुन्हा दाखल करण्यात येतो. याशिवाय दखलपात्र गुन्ह्यांव्यतिरिक्त महिलांच्या अनेक प्रकारच्या तक्रारी असतात. महिलांना कौटुंबिक तसेच व्यावसायिक ठिकाणी त्रास होत असतो. महिलांच्या अशा प्रकारच्या तक्रारी आल्यानंतर काही प्रकरणांमध्ये समेट घडवून ही प्रकरणे निकाली काढण्यात येतात. मात्र, तक्रारी निकाली काढल्यानंतरही थोड्या दिवसांनंतर तक्रारदार महिलांना संबंधित व्यक्तीकडून परत त्रास होण्याची शक्यता असते. त्यामुळे अशा घटनांना आळा घालण्याकरिता पुन:धैर्य योजना राबविण्यात आली आहे. महिलांशी संबंधित तक्रारींचे पुढे काय झाले, याचा आढावा दर शनिवारी घेतला गेला. मागील एक वर्षापासून पोलीस ठाण्यात प्राप्त तक्रारींमधील महिलांना पोलीस ठाण्यात बोलावून किंवा त्यांच्याशी संपर्क करून सध्या त्यांना कुठल्याही प्रकारचा त्रास अथवा छळवणूक होत असल्यास त्याबाबत विचारणा करण्यात आली. विविध पोलीस ठाण्यांत शनिवारी आढावा बैठक पार पडली. या वेळी वालीवमध्ये दोन, वसईत तीन, माणिकपूर आणि नवघर पोलीस ठाण्यात प्रत्येकी एका प्रकरणात महिलांना अजूनही त्रास होत असल्याचे आढळले. यानुसार संबंधित प्रकरणांमध्ये गुन्हे दाखल करण्याची प्रक्रिया सुरू आहे.

लोकसत्ता पा.नं. १५ ४.

# धर्मांतराला राजकीय रंग नको!

## सर्वोच्च न्यायालयाची टिप्पणी, उपाययोजनांबाबत सरकारकडे विचारणा

**पीटीआय, नवी दिल्ली**

**धर्मांतर ही** 'गंभीर समस्या' असून तिला राजकीय रंग देऊ नका, अशी टिप्पणी सर्वोच्च न्यायालयाने सोमवारी केली. त्याचबरोबर बळजबरीने होणारे धर्मांतर रोखण्यासाठी राज्यांना कठोर कारवाई करण्याचे निर्देश द्यावेत, अशी मागणी करणाऱ्या याचिकेसंदर्भात न्यायालयाने महान्यायवादी आर. व्यंकटरमणी यांच्याकडून मदतीची अपेक्षाही केली.

''धार्मिक स्वातंत्र्याचा अधिकार आणि धर्मांतराचा अधिकार यात फरक आहे'', असे न्यायमूर्ती एम. आर. शहा आणि न्यायमूर्ती सी. टी. रविकुमार यांच्या खंडपीठाने नमूद केले. धमकावणे, भेटवस्तूंचे प्रलोभन आणि पैशांचे आमिष इत्यादी मार्गांनी धर्मांतर करण्याच्या प्रकारांना प्रतिबंध करण्याची आग्रही मागणी याचिकाकर्त्यांनी केली आहे. या संदर्भात महान्यायवादी व्यंकटरमण यांनी न्यायालयाला न्यायमित्र (ॲमिकस क्युरी) म्हणून मदत करावी, असेही खंडपीठाने स्पष्ट केले. ''महाधिवक्ता, आम्हाला तुमचीही मदत हवी आहे. बळजबरीने आणि आमिष दाखवून धर्मांतर केले जात असेल तर, त्याबाबतीत काय केले पाहिजे? सुधारणात्मक उपाययोजना काय आहेत,'' अशी विचारणा खंडपीठाने केली.

प्रारंभी तमिळनाडू सरकारची बाजू मांडताना ज्येष्ठ विधिज्ञ पी. विल्सन यांनी संबंधित जनहित याचिका 'राजकीयदृष्ट्या प्रेरित' असा आरोप केला. तमिळनाडूत अशा धर्मांतराचा प्रश्नच उद्भवत नाही, असा प्रतिवादही त्यांनी खंडपीठापुढे केला.

विल्सन यांच्या युक्तिवादावर खंडपीठाने आक्षेप घेतला. ''तुमच्याकडे अशा प्रकारे संतापण्याची विविध कारणे असू शकतात. परंतु न्यायालयीन कामकाजाचे अन्य बाबींमध्ये रूपांतर करू नका. आम्हाला संपूर्ण देशाची चिंता आहे. तुमच्या राज्यात फसवणुकीतून धर्मांतर होत असेल तर ते वाईट आहे, नसेल तर चांगली गोष्ट आहे. एका राज्याला लक्ष्य केले जात आहे, असे समजू नका. या प्रश्नाला राजकीय बनवू नका,'' असे खंडपीठाने सुनावले. या प्रकरणाची सुनावणी आता ७ फेब्रुवारीला **(पान ४ वर)**

### याचिकेतील दावे...

- देशात असा एकही जिल्हा नाही जेथे बळजबरीने धर्मांतर केले जात नाही, त्यातून नागरिकांची होणारी हानी मोठी आहे.
- पैशांचे आमिष दाखवून, धमकावून आणि भेटवस्तू देऊन केल्या जाणाऱ्या धर्मांतराच्या घटना देशात दर आठवड्यात घडतात.
- जादूटोणा, चमत्कार यांसह अन्य अंधश्रद्धेच्या मार्गांनीही धर्मांतर घडवून आणले जाते.
- बळजबरीने धर्मांतर घडवले जात असतानाही ते रोखण्यासाठी केंद्र आणि राज्य सरकार कठोर पावले उचलत नाहीं.



### तमिळनाडूचा प्रतिवाद...

ज्येष्ठ विधिज्ञ पी. विल्सन यांनी तमिळनाडू सरकारची बाजू मांडली. धर्मांतराबाबतची जनहित याचिका 'राजकीयदृष्ट्या प्रेरित' असल्याचे नमूद करत तमिळनाडूत अशा धर्मांतराचा प्रश्नच उद्भवत नाही, असा प्रतिवादही त्यांनी केला.

### न्यायालय म्हणाले...

''धर्मांतर हा गंभीर मुद्दा आहे. धर्मांतराच्या मुद्द्यावरून एका राज्याला लक्ष्य केले जात आहे, असे समजू नका. आम्हाला संपूर्ण देशाची चिंता आहे. त्यामुळे या प्रश्नाला राजकीय बनवू नका, राजकीय रंग देऊ नका.'', असे सर्वोच्च न्यायालय म्हणाले.

# धर्मांतराला राजकीय रंग नको!

**(पान १ वरून)**

होणार आहे.

फसवणुकीतून होणाऱ्या धर्मांतरावर अंकुश ठेवण्यासाठी केंद्र आणि राज्यांना कठोर पावले उचलण्याचे निर्देश देण्याची मागणी करणारी याचिका भाजपचे नेते ॲड. अश्विनी कुमार उपाध्याय यांनी दाखल केली आहे. त्यावर खंडपीठापुढे सुनावणी सुरू आहे. न्यायालयाने २३ सप्टेंबरला या याचिकेवर केंद्र सरकार आणि इतरांना त्यांचे म्हणणे मांडण्याचे निर्देश दिले होते.

सक्तीचे धर्मांतर राष्ट्रीय सुरक्षिततेला धोका निर्माण करू शकते आणि नागरिकांच्या धार्मिक स्वातंत्र्यात बाधा आणू शकते, अशी चिंता सर्वोच्च न्यायालयाने या आधीच्या सुनावणीत व्यक्त केली होती.

त्याचबरोबर ही ''अत्यंत गंभीर'' समस्या सोडवण्यासाठी उपाययोजना करण्यासाठी केंद्र सरकारने प्रामाणिकपणे प्रयत्न करावेत, असेही खंडपीठाने म्हटले होते. फसवणूक, आमिष आणि धमकावून धर्मांतर करणे थांबवले नाही तर अत्यंत कठीण परिस्थिती उद्भवेल, असा इशाराही न्यायालयाने दिला होता.

धार्मिक स्वातंत्र्यात इतरांचे धर्मांतर करण्याच्या अधिकाराचा समावेश होत नाही असे गुजरात सरकारने पूर्वीच्या सुनावणीत सर्वोच्च न्यायालयाच्या निदर्शनास आणले होते.

तसेच विवाहाद्वारे धर्मांतरासाठी जिल्हा दंडाधिकाऱ्यांची पूर्वपरवानगी बंधनकारक असल्याच्या गुजरातच्या कायद्यातील तरतुदीवरील उच्च न्यायालयाची स्थगिती उठवण्याची विनंती खंडपीठापुढे केली होती.


म. टा. पु. पा. १.

# महिलांना 'धैर्या'चा आधार

## तक्रार निवारणासाठी विशेष योजना; पोलिस आयुक्तालयाचा नवीन उपक्रम

- मिरा-भाईंदर वसई-विरारमध्ये राबवणार योजना
- महिला पोलिस तक्रारदाराच्या संपर्कात राहणार

**म. टा. वृत्तसेवा**, मिरा-भाईंदर



पोलिस ठाण्यामध्ये पीडित महिलेने दाखल केलेल्या तक्रारीवर तडजोड झाल्यानंतर, तिला अनेकदा त्रास दिला जातो. असे प्रकार टाळण्याच्या दृष्टीने मिरा-भाईंदर वसई-विरार पोलिस आयुक्तालयाकडून सर्व पोलिस ठाण्यांमध्ये 'पुनःधैर्य' योजना राबवली जाणार आहे. या उपक्रमाअंतर्गत दर शनिवारी महिला पोलिस तक्रारदार महिलांशी संपर्क साधून माहिती घेणार आहेत.

कौटुंबिक व इतर प्रकरणांमध्ये महिलांकडून पोलिस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात येते. या तक्रारीची चौकशी करण्यासाठी, तक्रारदाराला तसेच ज्याच्याशी संबंधित ही तक्रार आहे अशा व्यक्तीला पोलिस ठाण्यात बोलावून गुन्हा दाखल करण्यासारखी पुढील कायदेशीर कार्यवाही करण्यात येते. काही प्रकरणांमध्ये महिला तक्रारदार व समोरच्या व्यक्तीमध्ये तडजोड झाल्यास, हे प्रकरण पोलिस दप्तरी निकाली काढण्यात येते. अशा प्रकरणांमध्ये काही दिवसांनंतर तक्रारदार महिलेला पुन्हा त्रास दिला जाण्याची शक्यता असते. तसे अनेकदा निदर्शनासही आले आहे.

अशा घटना रोखण्यासाठी मिरा-भाईंदर वसई-विरार पोलिस आयुक्त मधुकर पांडे यांच्या आदेशानुसार 'पुनःधैर्य' योजना राबवण्याचा निर्णय आयुक्तालयाने घेतला आहे. या योजनेअंतर्गत आयुक्तालयाच्या हद्दीतील सर्व पोलिस ठाण्यांमधील मागील एक वर्षाच्या कालावधीत ज्यांनी तक्रारी नोंदवल्या आहेत, त्या तक्रारदार महिलांशी संपर्क साधला जाणार आहे. तक्रारीच्या अनुषंगाने त्यांना कोणत्याही त्रासाला किंवा छळाला सामोरे जावे लागत नाही ना, याची माहिती घेतली जाणार आहे. संबंधित महिलेला कोणताही त्रास दिला जात असल्याचे निदर्शनास आल्यास योग्य ती कायदेशीर कार्यवाही केली जाणार आहे.

### श्रद्धा वालकर हत्येच्या पार्श्वभूमीवर पाठपुराव्याचे महत्त्व अधोरेखित

वसईची रहिवासी असलेल्या श्रद्धा वालकर हिची दिल्लीत तिच्या लिव्ह-इन जोडीदाराकडून निर्घृण हत्या झाल्याची घटना नुकतीच उघडकीस आली होती. श्रद्धा हिने तिच्या प्रियकराविरोधात वर्षभरापूर्वी वसईच्या तुळींज पोलिस ठाण्यात तक्रार दिल्याचेही त्यावेळी समोर आले होते. ही तक्रार श्रद्धाने नंतर मागे घेतली होती. या पार्श्वभूमीवर, अशा प्रकरणांमध्ये पाठपुरावा करणे किती महत्त्वपूर्ण ठरू शकते, हे श्रद्धाच्या हत्येमुळे अधोरेखित झाले होते. यासह अभिनेत्री तुनिषा शर्मा हिच्या आत्महत्येचे प्रकरणदेखील ताजेच आहे. पोलिस आयुक्तालयाच्या हद्दीत मागच्या वर्षभरात महिलांशी संबंधित ३०० गुन्हे घडले आहेत. महिलांशी संबंधित गंभीर गुन्हे रोखण्याच्या दृष्टीने 'पुनः धैर्य' योजना महत्त्वपूर्ण ठरणार असल्याचे मत तज्ज्ञांकडून व्यक्त केले जात आहे.

### जबाबदारी महिला पोलिसांवर

'पुनःधैर्य' योजनेअंतर्गत पोलिस ठाण्यात दाखल असलेल्या तक्रारी महिला पोलिस दर शनिवारी हाताळणार आहेत. त्याची जबाबदारी पोलिस अधिकारी/ अमलदार यांच्यावर दिली जाणार आहे. या योजनेच्या कामकाजावर सहायक पोलिस आयुक्त पर्यवेक्षण करणार असून उपायुक्तांच्या मार्गदर्शनाखाली ही योजना राबवली जाणार आहे. या योजनेचा आढावा पोलिस आयुक्तांकडून नियमित घेतला जाणार आहे.

---

# अतिरिक्त क्षेत्रावरील कराला कारखानदारांचा विरोध

**म. टा. वृत्तसेवा**, मिरा-भाईंदर

मिरा-भाईंदर महापालिकेने केलेल्या मालमत्तांच्या सर्वेक्षणात मालमत्ताधारकांकडून अतिरिक्त क्षेत्रफळाचा वापर केला जात असल्याचे निदर्शनास आल्यास, त्यानुसार जास्तीचा कर आकारणी केली जात आहे. या आकारणीला कारखानदारांनी विरोध केला होता. पोटमाळ्यासारख्या अतिरिक्त क्षेत्राचा वापर नगर परिषद कालावधीपासून होत असल्याचे तसेच इतर कारणे देत विरोध दर्शवण्यात आला होता. कारखानदारांनी ही भूमिका कायम ठेवत, करभरणा न करण्याचा निर्णय घेतला आहे.

मिरा-भाईंदर हद्दीतील सर्व मालमत्तांचे खासगी कंपनीमार्फत सर्वेक्षण केले जात आहे. यात पोटमाळा तसेच इतर पद्धतींनी जास्तीच्या क्षेत्रफळाचा वापर केला जात असल्याचे निदर्शनास आल्यास, संबंधित मालमत्ताधारकाकडून मागील पाच वर्षांच्या शस्तीसह कराची आकारणी केली जात आहे. उत्पन्नवाढीसाठी ही कार्यवाही होत आहे. त्यामुळे सहा वर्षांचा कर मालमत्ताधारकाला भरावा लागणार आहे.

### नगर परिषद काळापासून पोटमाळे असल्याची भूमिका

#### आकारणी योग्यच

पालिका उपायुक्त संजय शिंदे यांनी वाढीव क्षेत्रफळासाठी केलेली करआकारणी योग्य असून काही शंका असल्यास त्यांचे निवारण करण्यासाठी पालिका आयुक्तांच्या अध्यक्षतेखाली कारखानदारांची बैठक आयोजित केली जाणार असल्याचे त्यांनी सांगितले.

कारखान्यात पोटमाळ्यासारख्या अतिरिक्त क्षेत्राचा वापर नगर परिषदेच्या कालावधीपासून केला जात आहे. तसेच काही कारखाने रस्ता रुंदीकरणात बाधित झाल्यामुळे त्यांची उंची वाढवली आहे. त्यामुळे वाढीव क्षेत्रफळासाठी करभरणा न करण्याची भूमिका कारखानदारांनी घेतल्याची माहिती मिरा-भाईंदर लघु व सूक्ष्म कारखानदार युनियनकडून घेण्यात आली आहे.

← म. टा. पु. पा. १.

www.maharashtratimes.com

मुंबईचे नं.१ मराठी वृत्तपत्र

# महाराष्ट्र टाइम्स

मटा GOLD

वर्ष : ६२ । अंक : ८ मुंबई । मंगळवार, १० जानेवारी २०२३ । पाने १० + मुंबई टाइम्स । शहर आवृत्ती * । ₹ ५.०० किंवा ७.०० द टाइम्स ऑफ इंडियासहित

www.matagold.in

मटामध्ये जाहिरात देण्यासाठी 18001205474 वर कॉल करा. 'महाराष्ट्र टाइम्स'चा अंक मिळविण्यासाठी 18001200004 वर कॉल करा किंवा subscribe.timesgroup.com इथे जा.

# महिलांना 'धैर्या'चा आधार

## तक्रार निवारणासाठी विशेष योजना; पोलिस आयुक्तालयाचा नवीन उपक्रम

- मिरा-भाईंदर वसई-विरारमध्ये राबवणार योजना
- महिला पोलिस तक्रारदाराच्या संपर्कात राहणार

**म. टा. वृत्तसेवा,** मिरा-भाईंदर

पोलिस ठाण्यामध्ये पीडित महिलेने दाखल केलेल्या तक्रारीवर तडजोड झाल्यानंतर, तिला अनेकदा त्रास दिला जातो. असे प्रकार टाळण्याच्या दृष्टीने मिरा-भाईंदर वसई-विरार पोलिस आयुक्तालयाकडून सर्व पोलिस ठाण्यांमध्ये 'पुनःधैर्य' योजना राबवली जाणार आहे. या उपक्रमाअंतर्गत दर शनिवारी महिला पोलिस तक्रारदार महिलांशी संपर्क साधून माहिती घेणार आहेत.

कौटुंबिक व इतर प्रकरणांमध्ये महिलांकडून पोलिस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात येते. या तक्रारीची चौकशी करण्यासाठी, तक्रारदाराला तसेच ज्याच्याशी संबंधित ही तक्रार आहे अशा व्यक्तीला पोलिस ठाण्यात बोलावून गुन्हा दाखल करण्यासारखी पुढील कायदेशीर कार्यवाही करण्यात येते. काही प्रकरणांमध्ये महिला तक्रारदार व समोरच्या व्यक्तीमध्ये तडजोड झाल्यास, हे प्रकरण पोलिस दप्तरी निकाली काढण्यात येते. अशा प्रकरणांमध्ये काही दिवसांनंतर तक्रारदार महिलेला पुन्हा त्रास दिला जाण्याची शक्यता असते. तसे अनेकदा निदर्शनासही आले आहे.

अशा घटना रोखण्यासाठी मिरा-भाईंदर वसई-विरार पोलिस आयुक्त मधुकर पांडे यांच्या आदेशानुसार 'पुनःधैर्य' योजना राबवण्याचा निर्णय आयुक्तालयाने घेतला आहे. या योजनेअंतर्गत आयुक्तालयाच्या हद्दीतील सर्व पोलिस ठाण्यांमधील मागील एक वर्षाच्या कालावधीत ज्यांनी तक्रारी नोंदवल्या आहेत, त्या तक्रारदार महिलांशी संपर्क साधला जाणार आहे. तक्रारीच्या अनुषंगाने त्यांना कोणत्याही त्रासाला किंवा छळाला सामोरे जावे लागत नाही ना, याची माहिती घेतली जाणार आहे. संबंधित महिलेला कोणताही त्रास दिला जात असल्याचे निदर्शनास आल्यास योग्य ती कायदेशीर कार्यवाही केली जाणार आहे.



### श्रद्धा वालकर हत्येच्या पार्श्वभूमीवर पाठपुराव्याचे महत्त्व अधोरेखित

वसईची रहिवासी असलेल्या श्रद्धा वालकर हिची दिल्लीत तिच्या लिव्ह-इन जोडीदाराकडून निर्घृण हत्या झाल्याची घटना नुकतीच उघडकीस आली होती. श्रद्धा हिने तिच्या प्रियकराविरोधात वर्षभरापूर्वी वसईच्या तुळींज पोलिस ठाण्यात तक्रार दिल्याचेही त्यावेळी समोर आले होते. ही तक्रार श्रद्धाने नंतर मागे घेतली होती. या पार्श्वभूमीवर, अशा प्रकरणांमध्ये पाठपुरावा करणे किती महत्त्वपूर्ण ठरू शकते, हे श्रद्धाच्या हत्येमुळे अधोरेखित झाले होते. यासह अभिनेत्री तुनिषा शर्मा हिच्या आत्महत्येचे प्रकरणदेखील ताजेच आहे. पोलिस आयुक्तालयाच्या हद्दीत मागच्या वर्षभरात महिलांशी संबंधित ३०० गुन्हे घडले आहेत. महिलांशी संबंधित गंभीर गुन्हे रोखण्याच्या दृष्टीने 'पुनः धैर्य' योजना महत्त्वपूर्ण ठरणार असल्याचे मत तज्ज्ञांकडून व्यक्त केले जात आहे.

### जबाबदारी महिला पोलिसांवर

'पुनःधैर्य' योजनेअंतर्गत पोलिस ठाण्यात दाखल असलेल्या तक्रारी महिला पोलिस दर शनिवारी हाताळणार आहेत. त्याची जबाबदारी पोलिस अधिकारी/ अमलदार यांच्यावर दिली जाणार आहे. या योजनेच्या कामकाजावर सहायक पोलिस आयुक्त पर्यवेक्षण करणार असून उपायुक्तांच्या मार्गदर्शनाखाली ही योजना राबवली जाणार आहे. या योजनेचा आढावा पोलिस आयुक्तांकडून नियमित घेतला जाणार आहे.



हमारा मैट्रो 3

पटना, मंगलवार 10 जनवरी 2023


# फ़िल्म शूटिंग हेतु वसूले जा रहे शुल्क पर एनसीपी आक्रामक

(विनय महाजन)

**मुंबई हमारा मेट्रो ब्यूरो** मीरा भायंदर मनपा द्वारा फ़िल्म चित्रिकरण के लिए प्रोडक्शन कंपनियो से लिए जाने वाले शुल्क में बढ़ोतरी का विरोध जताते हुए एनसीपी चित्रपट, साहित्य कला एवं सांस्कृतिक विभाग के जिला अध्यक्ष रोहित गुप्ता ने महाराष्ट्र के मुख्यमंत्री एकनाथ शिंदे , सांस्कृतिक मंत्री सुधीर मुंगंटीवार तथा मीरा-भायंदर मनपा आयुक्त दिलीप ढोले को शुल्क दरों में बढ़ोतरी को कम करने हेतु पत्र लिखा है। इस संबंध में प्रेस को संबोधित करते हुए रोहित गुप्ता ने बताया की पहले फ़िल्म शूटिंग के लिए मनपा द्वारा जो शुल्क लिया जाता था, अब वह तीन गुना हो गया है वहीं यह शुल्क अन्य महानगर पालिकाओं से भी अधिक है , मीरा भायंदर मनपा द्वारा हिंदी फ़िल्म प्रोडक्शन कंपनी से शूटिंग के लिए पहले




जहाँ 25 हजार रूपये लिए जाते थे अब वहां 35 हजार रुपये लिए जाने लगे हैं, वहीं मराठी फ़िल्म प्रोडक्शन कंपनी से पहले जहाँ पहले 5 हजार रूपये लिए जाते थे अब उसे बढ़ाकर 15 हजार रुपये कर दिया गया है द्य गुप्ता ने कहा, एक तरफ महाराष्ट्र सरकार मराठी फ़िल्म उद्योग को बढ़ावा देने के लिए तरह तरह की योजनाएं बना रही है, सरकार फ़िल यूनियन से मिलकर इस प्रयास में जुड़ी है की कलाकारों की आर्थिक स्थिति क मजबूत बनाया जाए, वहीं मीरा भायंद मनपा द्वारा शूटिंग के लिए बढ़ाये गए शुल् से नुकसान आम गरीब कलाकारों क होगा, वही यह बढ़ाया गया शुल्क अन दूसरी नगर पालिकाओं से कहीं ज्यादा है रोहित गुप्ता ने बताया मुंब महानगरपालिका,वसई विरा महानगरपालिका,कल्याण डोंबिवली, य अन्य किसी भी महानगरपालिका में इस तरह शुल्क बढ़ोतरी नहीं है, सिर्फ मी भाईंदर महानगरपालिका में मनमान बढ़ोतरी की जा रही है। उन्होंने कहा कि यदि शुल्क में बढ़ोतरी को वापस न लिया गया तो हम सभी कलाकार मी भाईंदर महानगरपालिका में आंदोल करेंगे।

लोकमत

# प्रेयसीने संबंध तोडले म्हणून विनयभंग



नालासोपारा : पूर्वाश्रमीच्या प्रेयसीने आरोपीसोबत असलेले प्रेमसंबंध तोडल्याचा राग आल्याने तिच्या घरच्यांसमोर त्याने तिचा विनयभंग केल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. नालासोपारा येथील २७ वर्षीय तरुणीचे एका तरुणाशी प्रेमसंबंध होते. मात्र, त्या तरुणाने इतर मुलीशी लग्न केल्याने त्याची माहिती मिळताच तरुणीने त्याच्याशी असलेले प्रेमसंबंध संपुष्टात आणले होते. याचा राग येऊन आरोपी तरुणाने शनिवारी रात्री साडेबारा वाजता तरुणीच्या घरी जात सर्वांसमोर तिचा विनयभंग केला होता. तसेच तरुणीच्या बहिणीला शिवीगाळ करत घरातील चार जणांना मारहाण केली होती. रविवारी आचोळे पोलिसांनी विनयभंगाचा गुन्हा दाखल केला.

Hello Vasai
Page No. 1 Jan 10, 2023
Powered by: erelego.com

लोकमत

# तुनीषाच्या आयुष्यात अली असल्याचा शिजानचा दावा

## धोकादायक औषधे घेत असल्याचा युक्तिवाद, जामिनावर उद्या सुनावणी

लोकमत न्यूज नेटवर्क

**नालासोपारा :** शिजानसोबत ब्रेकअप झाल्यानंतर तुनीषा शर्माच्या आयुष्यात अली नावाची व्यक्ती आली होती. मृत्यूच्या १५ मिनिटे आधी तुनीषा अलीशी व्हिडीओ कॉलवर १५ मिनिटे बोलली होती. त्यामुळे शिजान नव्हे, तर अली हा तिच्या संपर्कात असल्याचा दावा अभिनेता शिजान खानचे वकील शैलेंद्र मिश्रा यांनी सोमवारी वसई न्यायालयात केला. शिजानच्या जामिनावरील सुनावणीदरम्यान त्यांनी हा युक्तिवाद केला. यावरील बाजू मांडण्याचे काम अपूर्ण राहिल्याने पुढील सुनावणी ११ जानेवारीला होईल.

तुनीषा काही औषधे घेत होती. ती औषधे धोकादायक होती, असा दावाही त्यांनी न्यायालयात केला. तुनीषा-शिजानने ब्रेकअप झाल्यानंतरही त्यांच्यात मैत्रीचे संबध होते. ती टिंडर या डेटिंग ॲपवर सक्रिय होती. तेथे तिची अलीसोबत मैत्री झाली व ते तिच्या आईला माहीत होते. तुनीषा अलीसोबत डेटवरही गेली होती. २१ ते २३ डिसेंबरदरम्यान तुनीषा अलीशी बोलली. २३ डिसेंबरला तिने अलीच्या फोनवरून आईला व्हिडीओ कॉलही केला होता, असा दावा मिश्रा यांनी शिजानच्या वतीने केला.

शिजान १० दिवसांपासून ठाण्याच्या मध्यवर्ती तुरुंगात आहे. त्याला १४ दिवसांची न्यायालयीन कोठडी सुनावली होती. त्याने जामिनासाठी अर्ज केला असून, त्यावर युक्तिवाद सुरू आहे.


तुनीषाला शिजान उर्दू शिकवत असल्याच्या तिच्या आईच्या दाव्यात तथ्य नाही. शिजानला, त्याचा बहिणींना उर्दू येत नाही. शिजान जे उर्दू बोलतो, ते डायलॉग त्याच्या स्क्रिप्टमध्ये असतात. शिवाय तुनीषाला हिजाबची सक्ती केल्याचा आरोपही वस्तुस्थितीला धरून नाही. तिचे हिजाबचे फोटो हे मालिकेच्य शूटदरम्यानचे आहेत, असेही त्याच वकिलांनी न्यायालयाच्या निदर्शनास आणले. तुनीषाने तिचा सहकलाका आणि मित्र पार्थला तिच्या समस्या सांगितल्या होत्या. जेव्हा शिजानल याची माहिती मिळाली, तेव्हा त्यान तुनीषाच्या कुटुंबीयांशी संपर्क साधल आणि त्यांना याची माहिती दिली.

### मुस्लीम असल्यामुळेच अटक केल्याचा दावा

शिजान मुस्लिम असल्यामुळेच त्याच्यावर लव्ह जिहादचे आरोप झाले. त्याला अटक करण्यात आली. तो मुस्लिम नसता तर अटक झाली नसती, असा दावाही त्याच्या वकिलांनी केला. त्याच्याविरुद्ध कोणतेही पुरावे नाहीत, तरीही लव्ह जिहादसह आत्महत्येस प्रवृत्त केल्याप्रकरणी त्याची दोन दिवस चौकशी करण्यात आली, असे म्हणणे मिश्रा यांनी मांडले.

### तुनीषा दुसऱ्याशी बोलते शिजानला कसे कळले?





१ शिजानचे वकील शैलेंद्र मिश्रा यांच्या युक्तिवादानंतर तुनीषाचे वकील तरुण शर्मा यांनी बचाव पक्षाकडून काही कागदपत्रे सादर केली आहेत. याचे उत्तर देण्यासाठी थोडा वेळ लागेल, असे म्हणणे मांडले. त्यांनी न्यायालयाकडे ११ जानेवारीपर्यंत मुदतवाढ मागितली.

२ आत्महत्येपूर्वी शिजान तुनीषाशी बोलला नाही, तर ती दुसऱ्याशी बोलत आहे, हे त्याला कसे कळले, असा सवाल त्यांनी केला.

३ तुनीषाच्या आयफोनवरून पोलिसांना अद्याप ती कोणाशी बोलली, याचा शोध लावता आलेला नाही, याकडे त्यांनी न्यायालयाचे लक्ष वेधले.

Mumbai Main
Page No. 4 Jan 10, 2023
Powered by: erelego.com

लोकमत

# मांडवीत तंबाखूजन्य पदार्थांचा साठा जप्त

नालासोपारा : मांडवी पोलिस ठाण्याच्या हद्दीत मांडवी-वज्रेश्वरी रोडवर पोलिसांनी तंबाखूजन्य पदार्थांचा साठा जप्त केला आहे. रविवारी पहाटे अडीचच्या सुमारास आरोपी चालक कन्हैयालाल गुर्जर (२०) हा कार घेऊन मांडवी-वज्रेश्वरी रोड येथून जात असताना मांडवी पोलिसांनी संशयास्पद कारची झडती घेतली. त्या कारमध्ये महाराष्ट्र शासनाने प्रतिबंधित केलेला तंबाखूजन्य पदार्थ आढळून आला होता. त्यात विविध कंपन्यांचा पानमसाला व ७६ हजार १२० रुपये किमतीचा तंबाखूजन्य पदार्थांचा साठा आढळला. तसेच कार असा एकूण ३ लाख ७६ हजारांचा मुद्देमाल जप्त केला आहे. रविवारी मांडवी पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे.

Hello Vasai
Page No. 1 Jan 10, 2023
Powered by: erelego.com

लोकमत

# वसईत तहसीलदारांविरोधात तहसील कार्यालयासमोर आंदोलन

## वसई किनारपट्टी व पर्यावरण बचाव समितीकडून निषेध

लोकमत न्यूज नेटवर्क

**नालासोपारा** : वसई किनारपट्टी व पर्यावरण बचाव समितीमार्फत सोमवारी प्रांत कार्यालय व तहसीलदार कार्यालयासमोर निषेध आंदोलन करण्यात आले. यावेळी बचाव समितीमार्फत घोषणा देत विविध मागण्या प्रांत अधिकाऱ्यांना निवेदन स्वरूपात देण्यात आल्या आहेत.




वसईत तहसीलदारांविरोधात वसई किनारपट्टी व पर्यावरण बचाव समितीकडून धरणे आंदोलन करण्यात आले.

या मागण्यांमध्ये प्रामुख्याने वसई तहसीलदार उज्ज्वला भगत कार्यरत झाल्यापासून तहसीलदार कार्यालयाच्या कार्यक्षेत्रातील खाजण, गायरान, पाणथळ या जमिनी अतिक्रमणित झाल्या आहेत. या अतिक्रमित खाजण व गुरचरण जमिनीचे भूमी अभिलेख विभागामार्फत जमीन मोजणी व हद्द निश्चितीचे कामकाज झाले आहे. मात्र खाजण जमिनीवरील अतिक्रमण आणि बेकायदा बांधकाम निष्कासित करण्याची मोहीम त्यांनी राबविली नाही. ज्या माती भरावाच्या परवानग्या दिल्या आहेत, त्या परवानगी प्रक्रियेत प्रचंड अनियमितता झालेली आहे. विशेष म्हणजे जे रॉयल्टीचे वितरण केलेले आहे, ते नियमबाह्य आणि शासनाची फसवणूक करणारे आहे, असा आरोप निवेदनात केला आहे.

राज्य शासनाचे नियम निर्देश, सर्वोच्च न्यायालय आणि मुंबई उच्च न्यायालय यांचे निर्देश तहसीलदार यांनी मोडीत काढून इको सेन्सेटिव्ह झोनमध्ये निर्माण होणाऱ्या खदान, क्रेशर मशीन आणि बिगर वनेतर अशा व्यावसायिक घटकांना अलिखित अभय दिलेले आहे. अशा स्वरूपाच्या कार्यपद्धतीमुळे शासकीय विश्वासार्हता धुळीस मिळालेली आहे. पर्यावरणाचा समतोल बिघडत असून वसईतील हरित पट्ट्यात कांदळवनासारख्या महत्त्वपूर्ण जैविक मातीभराव करणाऱ्या माफियांकडून दररोज बाधित होत आहे. कांदळवन कत्तलीबाबत अनेक तक्रारी प्राप्त होऊनही त्यांनी हेतुपुरस्कर दुर्लक्ष करीत आहेत, असेही निवेदनात म्हटले आहे.

राज्य सरकारने तहसीलदारांच्या कामकाजाची चौकशी करण्यासाठी एसआयटी नेमण्याची मागणी करण्यात आली आहे. यावेळी प्रांत अधिकारी स्वप्नील तांगडे यांनी उपस्थित आंदोलन करताना वेळ नियोजित करून त्यांच्या समस्या, प्रकरणे या संदर्भामध्ये २७ जानेवारी रोजी बैठकीचे आश्वासन दिले आहे. यावेळी श्याम पाटकर, प्रफुल्ल ठाकूर, मेकॅन्झी डाबरे, संजय कोळी, जो घोन्सालविस, अमित पवार, नीलेश वर्तक, विन्सेंट परेरा इत्यादी कार्यकर्ते उपस्थित होते.

Hello Vasai
Page No. 3 Jan 10, 2023
Powered by: erelego.com

दैनिक समाचार पत्र
लखनऊ, कानपुर, उन्नाव, झाँसी, मथुरा व प्रयागराज से प्रसारित
RNI NO - UPHIN2007/22822
खबर सिर्फ जनहित के लिए
पब्लिक पॉवर
सूर्या न्यूज़ 24
आपकी बुलन्द आवाज़
लखनऊ,मंगलवार,10,जनवरी,2023, वर्ष 06, अंक :110 पृष्ठ :08, मूल्य 2रू/-

# संतोष भुवन में छापेमारी , 2 महिलाओं को वेश्यावृत्ति से छुड़ाया गया

मुंबई पवन पंडित

वसई ; एमबीवीवी पुलिस आयुक्तालय अंतर्गत अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंध कक्ष,नालासोपारा टीम द्वारा नालासोपारा पूर्व के सन्तोष भुवन क्षेत्र में स्वागत लॉज पर छापेमारी कर 2 महिलाओं को वेश्यावृत्ति से छुड़ाया तथा मैनेजर व दलाल को गिरफ्तार किया है,जबकि 5 आरोपी फरार बताए जा रहे है। यह कार्रवाई क्राइम एसीपी अमोल मांडवे के मार्गदर्शन में पुलिस निरीक्षक संतोष चौधरी की टीम ने की है। मिली जानकारी के अनुसार,7 जनवरी (शनिवार रात्रि ) को एस.एस ब्रांच के पुलिस निरीक्षक संतोष चौधरी को गुप्त सूचना मिली कि सन्तोष भुवन इलाके में स्वागत लॉज में वेश्यावृत्ति चलाया जा रहा है।सूचना के आधार पर बोगस ग्राहक के माध्यम से छापामार कर दो महिलाओं को छुड़ाने में सफलता अर्जित की। पुलिस ने बताया कि इस मामले में कुल 7 आरोपी है,इन सभी के खिलाफ तुलिंज थाने में विभिन्न धाराओं के तहत केस दर्ज किया गया है। तथा मैनेजर यल्लपा आंनद कुंचीपोरवे व दलाल विलास पंडित को गिरफ्तार किया गया है,बाकी अन्य 5 फरार बताए जा रहे है,आगे की तहकीकात पुलिस कर रही है।

## गन्ने का बकाया भुगतान तुरंत न होने पर चीनी मिलों को वरुण गांधी ने दी चेतावनी

पब्लिक पावर/ धर्मेंद्र कुमार ब्यूरो प्रमुख उत्तर प्रदेश

बरेली।पीलीभीत से भारतीय जनता पार्टी के सांसद वरुण गांधी ने कहा है या तो चीनी मिलें किसानों को गन्ने के बकाए का



दैनिक
# मुंबई केसरी टाइम्स
एक साथ प्रकाशित, पालघर, ठाणे, मुंबई,
www.mumbaikesaritimes.com
वर्ष : १५ अंक : २१४ मंगळवार 10 जनवरी 2023 मूल्य 2 रुपए Post-Reg- No. PLG/95/2020/2022 पृष्ठ : 04

## अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंध कक्ष,नालासोपारा की कार्रवाई

## २ महिलाओं को छुड़ाया

**वसई** ; एमबीवीवी पुलिस आयुक्तालय अंतर्गत अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंध कक्ष,नालासोपारा टीम द्वारा नालासोपारा पूर्व के सन्तोष भुवन क्षेत्र में स्वागत लॉज पर छापेमारी कर 2 महिलाओं को वेश्यावृत्ति से छुड़ाया तथा मैनेजर व दलाल को गिरफ्तार किया है,जबकि 5 आरोपी फरार बताए जा रहे है। यह कार्रवाई क्राइम एसीपी अमोल मांडवे के मार्गदर्शन में पुलिस निरीक्षक संतोष चौधरी की टीम ने की है। मिली जानकारी के अनुसार,7 जनवरी (शनिवार रात्रि ) को एस.एस ब्रांच के पुलिस निरीक्षक संतोष चौधरी को गुप्त सूचना मिली कि सन्तोष भुवन इलाके में स्वागत लॉज में वेश्यावृत्ति चलाया जा रहा है।सूचना के आधार पर बोगस ग्राहक के माध्यम से छापामार कर दो महिलाओं को छुड़ाने में सफलता अर्जित की। पुलिस ने बताया कि इस मामले में कुल 7 आरोपी है,इन सभी के खिलाफ तुलिंज थाने में विभिन्न धाराओं के तहत केस दर्ज किया गया है। तथा मैनेजर यल्लपा आंनद कुंचीपोरवे व दलाल विलास पंडित को गिरफ्तार किया गया है,बाकी अन्य 5 फरार बताए जा रहे है,आगे की तहकीकात पुलिस कर रही है।

दैनिक आमची मुंबई
ठाणे/पालघर येथून एकाचवेळी प्रकाशित.
वर्ष : ११ | अंक: २६२ | मंगळवार १० जानेवारी २०२३ | Post-Reg-No. PLG/158/2022-2024 | रु. २ | पाने: ०४


# अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंध कक्षाची नालासोपारा कारवाई, २ महिलांची सुटका

**वसई.** MBVV पोलीस आयुक्तालय अंतर्गत अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंध कक्ष, नालासोपारा पथकाने नालासोपारा पूर्व येथील संतोष भुवन परिसरातील वेलकम लॉजवर छापा टाकून २ महिलांची वेश्याव्यवसायातून सुटका करून व्यवस्थापक व दलाल यांना अटक केली, तर ५ आरोपी फरार असल्याचे सांगण्यात येत आहे. क्राईमचे एसीपी अमोल मांडवे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक संतोष चौधरी यांच्या पथकाने ही कारवाई केली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, ७ जानेवारी (शनिवारी रात्री) एस.एस. शाखेचे पोलीस निरीक्षक संतोष चौधरी यांना संतोष भुवन परिसरातील स्वागत लॉजमध्ये वेश्याव्यवसाय चालविला जात असल्याची गुप्त माहिती मिळाली.दोन महिलांची सुटका करण्यात यश आले. याप्रकरणी एकूण ७ आरोपी असून, या सर्वांविरुद्ध तुळींज पोलीस ठाण्यात विविध कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला असल्याचे पोलिसांनी सांगितले. व व्यवस्थापक यल्लापा आनंद कुंचीपोरवे व दलाल विलास पंडित यांना अटक करण्यात आली आहे, उर्वरित ५ जण फरार असल्याचे सांगण्यात येत आहे, पुढील तपास पोलीस करत आहेत.

1997 से
KAT खबरें आज तक
not a publication of the living media india group
वर्षः 26 अंक-207 मुंबई, मंगलवार 10 जनवरी 2023 पृष्ठ-12 मूल्य : 2.00

# स्वागत लॉज पर रेड में दो महिलाओं को छुड़ाया, मैनेजर समेत दो गिरफ्तार

**वसईः** एमबीवीवी पुलिस आयुक्तालय अंतर्गत अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंध कक्ष, नालासोपारा टीम द्वारा नालासोपारा पूर्व के सन्तोष भुवन क्षेत्र में स्वागत लॉज पर छापेमारी कर 2 महिलाओं को वेश्यावृत्ति से छुड़ाया तथा मैनेजर व दलाल को गिरफ्तार किया है, जबकि 5 आरोपी फरार बताए जा रहे है। यह कार्रवाई क्राइम एसीपी अमोल मांडवे के मार्गदर्शन में पुलिस निरीक्षक संतोष चौधरी की टीम ने की है। मिली जानकारी के अनुसार, 7 जनवरी (शनिवार रात्रि ) को एस.एस ब्रांच के पुलिस निरीक्षक संतोष चौधरी को गुप्त सूचना मिली कि सन्तोष भुवन इलाके में स्वागत लॉज में वेश्यावृत्ति चलाया जा रहा है।सूचना के आधार पर बोगस ग्राहक के माध्यम से छापामार कर दो महिलाओं को छुड़ाने में सफलता अर्जित की। पुलिस ने बताया कि इस मामले में कुल 7 आरोपी है, इन सभी के खिलाफ तुलिंज थाने में विभिन्न धाराओं के तहत केस दर्ज किया गया है। तथा मैनेजर




यल्लपा आंनद कुंचीपोरवे व दलाल विलास पंडित को गिरफ्तार किया गया है, बाकी अन्य 5 फरार बताए जा रहे है, आगे की तहकीकात पुलिस कर रही है।

दबंग दुनिया
निष्पक्ष नज़र, निष्पक्ष खबर

# लॉज पर एस. एस ब्रांच की छापेमारी, दो गिरफ्तार

**वसई।** एमबीवीवी पुलिस आयुक्तालय अंतर्गत अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंध कक्ष, नालासोपारा टीम द्वारा नालासोपारा पूर्व के सन्तोष भुवन क्षेत्र में स्वागत लॉज पर छापेमारी कर 2 महिलाओं को वेश्यावृत्ति से छुड़ाया तथा मैनेजर व दलाल को गिरफ्तार किया है,जबकि 5 आरोपी फरार बताए जा रहे है। यह कार्रवाई क्राइम एसीपी अमोल मांडवे के मार्गदर्शन में पुलिस निरीक्षक संतोष चौधरी की टीम ने की है। मिली जानकारी के अनुसार, 7 जनवरी (शनिवार रात्रि ) को एस.एस ब्रांच के पुलिस निरीक्षक संतोष चौधरी को गुप्त सूचना मिली कि सन्तोष भुवन इलाके में स्वागत लॉज में वेश्यावृत्ति चलाया जा रहा है। सूचना के आधार पर बोगस ग्राहक के माध्यम से छापामार कर दो महिलाओं को छुड़ाने में सफलता अर्जित की। पुलिस ने बताया कि इस मामले में कुल 7 आरोपी है। इन सभी के खिलाफ तुलिंज थाने में विभिन्न धाराओं के तहत केस दर्ज किया गया है। तथा मैनेजर यल्लपा आंनद कुंचीपोरवे व दलाल विलास पंडित को गिरफ्तार किया गया है,बाकी अन्य 5 फरार बताए जा रहे है,आगे की तहकीकात पुलिस कर रही है।